2023 III 23 - 1100

२०२३ . ०३ . २३ - ११००

N 956

Seat No.
बैठक क्र.

Time : 2 Hours SOCIAL SCIENCES (73) HISTORY & POLITICAL SCIENCE—PAPER-I (M)

वेळ - २ तास सामाजिक शास्त्रे (७३) इतिहास व राज्यशास्त्र—पेपर-१ (म)

(REVISED COURSE)

Pages - 11
पृष्ठे - ११

Total Marks : 40
एकूण गुण - ४०

सूचना :— (1) *सर्व* कृती/प्रश्न सोडविणे आवश्यक आहेत.

(2) उजवीकडील अंक प्रश्नांचे/कृतींचे पूर्ण गुण दर्शवितात.

(3) प्रश्न क्रमांक 1 ते 5 प्रश्न/कृती इतिहास व प्रश्न क्रमांक 6 ते 9 प्रश्न/कृती राज्यशास्त्र या विषयांवरील आहे.

(4) प्रश्न क्रमांक 1(अ) आणि 6 मध्ये संपूर्ण विधान लिहिणे आवश्यक आहे.

(5) प्रश्न क्रमांक 2(अ) आणि 8(ब) मधील संकल्पनाचित्रे/कृती त्याच नमुना आराखड्यात पेनाने उत्तरपत्रिकेत तयार करणे अपेक्षित आहे.

(6) प्रश्न 1ला (अ), (ब) व प्रश्न 6वा या प्रश्नांची उत्तरे उत्तरपत्रिकेत एकापेक्षा जास्त वेळा लिहिलेले असेल तर प्रथम लिहिलेले उत्तर हे गुणांसाठी गृहीत धरले जाईल.

(अ) दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा : 3

(1) लिओनार्दो द विंची या जगप्रसिद्ध इटालियन चित्रकाराने रेखाटलेल्या .... या चित्राचा समावेश लुव्र संग्रहालयात आहे.

(अ) नेपोलियन

(ब) मोनालिसा

(क) हॅन्स स्लोअन

(ड) दुसरा जॉर्ज

(2) थॉमस कुकने .... विकण्याचा एजन्सी व्यवसाय सुरू केला.

(अ) हस्तकौशल्याच्या वस्तू

(ब) खेळणी

(क) खाद्यवस्तू

(ड) पर्यटन तिकिटे

(3) एकोणिसाव्या शतकात स्त्रियांविषयी लेखन करणाऱ्या लेखिकांमध्ये .... यांचे नाव अग्रणी आहे.

(अ) ताराबाई शिंदे

(ब) पंडिता रमाबाई

(क) मीरा कोसंबी

(ड) शर्मिला रेगे

(ब) पुढीलपैकी प्रत्येक गटातील चुकीची जोडी ओळखून पुन्हा लिहा : **3**

(1)

	शहरे		ग्रंथालय
(*i*)	कोलकाता	—	नॅशनल लायब्ररी
(*ii*)	दिल्ली	—	नेहरू मेमोरियल म्युझियम अंड लायब्ररी
(*iii*)	हैदराबाद	—	स्टेट सेंट्रल लायब्ररी
(*iv*)	पुणे	—	लायब्ररी ऑफ एशियाटिक सोसायटी

(2)	विचारवंत		देश
(i)	कार्ल मार्क्स	—	इंग्लंड
(ii)	मायकेल फुको	—	फ्रांस
(iii)	लिओपॉल्ड व्हॉन रांके	—	जर्मनी
(iv)	हिरोडोटस	—	ग्रीस
(3)	नियतकालिके		कालावधी
(i)	साप्ताहिक	—	सात दिवस
(ii)	पाक्षिक	—	पंधरा दिवस
(iii)	मासिक	—	एक महिना
(iv)	त्रैमासिक	—	दोन महिने

2. (अ) दिलेल्या सूचनेनुसार कृती करा (कोणतेही *दोन*) : 4

(1) पुढील संकल्पनाचित्र पूर्ण करा :



(2) पुढील संकल्पनाचित्र पूर्ण करा :



(3) पुढील संकल्पनाचित्र पूर्ण करा :



(ब) **थोडक्यात टिपा लिहा (कोणत्याही दोन) :** 4

(1) द्वंद्ववाद

(2) जनांसाठी इतिहास

(3) मराठी रंगभूमी.

3. **पुढील विधाने सकारण स्पष्ट करा (कोणतेही दोन) :** 4

(1) सर्व प्रसारमाध्यमांत दूरदर्शन अतिशय लोकप्रिय माध्यम आहे.

(2) महाराष्ट्रात संत एकनाथांची भारुडे लोकप्रिय झाली.

(3) आयुर्वेदिक उपचारासाठी परदेशी पर्यटक भारतात येतात.

(4) मेजर ध्यानचंद यांना हॉकीचे जादूगार म्हणतात.

4. दिलेल्या उताऱ्याचे वाचन करून त्याखालील प्रश्नांची उत्तरे लिहा :

खेळ आणि ग्रीक लोक यांचे नाते प्राचीन काळापासूनचे आहे. खेळांना नियमित व सुसंघटित स्वरूप ग्रीकांनी दिले. धावणे, थाळीफेक, रथ व घोड्यांच्या शर्यती, कुस्ती, मुष्टियुद्ध इत्यादींचे सामने त्यांनी सुरू केले. प्राचीन ऑलिंपिक ही खेळाची स्पर्धा ऑलिंपिया या ग्रीक शहरात घेतली जात असे. या स्पर्धेत भाग घेणे व विजय मिळवणे मानाचे समजले जाते.

(1) प्राचीन ऑलिंपिक खेळाची स्पर्धा कोणत्या शहरात घेतली जात असे ? 1

(2) खेळ आणि ग्रीक लोक यांचे नाते कोणत्या काळापासूनचे आहे ? 1

(3) ऑलिंपिक स्पर्धाविषयी आपले मत मांडा. 2

5. पुढील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा (कोणतेही *दोन*) : **6**

(1) बखर म्हणजे काय ते सांगून बखरीच्या प्रकारांविषयी सविस्तर माहिती लिहा.

(2) इतिहासाच्या साधनांचे जतन व्हावे यासाठी किमान **सहा** उपाय सुचवा.

(3) पर्यटनाशी संबंधित व्यावसायिक क्षेत्रे स्पष्ट करा.

(4) अभिलेखागाराच्या व्यवस्थापनात कोणती कामे महत्त्वाची आहेत ?

6. दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा : **2**

(1) पुढील कोणत्या कायद्याद्वारे महिलांना त्यांचे स्वातंत्र्य जपण्यास आणि स्वत:चा विकास साधण्यास अनुकूल वातावरण निर्माण केले आहे ?

(अ) माहितीचा अधिकार कायदा

(ब) हुंडाप्रतिबंधक कायदा

(क) अन्नसुरक्षा कायदा

(ड) शिक्षण हक्क कायदा

(2) 1986 साली .... अस्तित्वात आला.

(अ) ग्राहक संरक्षण कायदा

(ब) कामगार कायदा

(क) माहितीचा अधिकार कायदा

(ड) हुंडा विरोधी कायदा

'. पुढील विधाने चूक की बरोबर ते सकारण स्पष्ट करा (कोणतेही दोन) : 4

(1) संविधानाचे स्वरूप एखाद्या जिवंत दस्तऐवजाप्रमाणे असते.

(2) विशिष्ट प्रसंगी निवडणूक आयोग एखाद्या मतदारसंघात पुन्हा निवडणुका घेतात ?

(3) चळवळीला खंबीर नेतृत्वाची गरज नसते.

8. (अ) पुढील संकल्पना स्पष्ट करा (कोणतेही एक) : 2

(1) राष्ट्रीय पक्ष

(2) भ्रष्टाचार.

(ब) दिलेल्या सूचनेनुसार कृती करा (कोणतीही एक) : 2

(1) पुढील संकल्पनाचित्र पूर्ण करा :



(2) पुढील संकल्पनाचित्र पूर्ण करा :



9. पुढील प्रश्नाचे थोडक्यात उत्तर लिहा (कोणतेही एक) : **2**

(1) सामाजिक न्याय प्रस्थापित करणे म्हणजे काय ?

(2) मुक्त व न्याय्य निवडणुका घेण्यासमोरील आव्हाने कोणती आहेत ?